महासत्ता

# शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण अभ्यासक्रमांना युजीसीची मान्यता

**कोल्हापूर, ता.८ (प्रतिनिधी)–**

.........................

**शिवाजी विद्यापीठाच्या दूरस्थ: आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राकडील विविध अभ्यासक्रमांना नवी दिल्ली येथील विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) यांच्याकडून सलग पाच वर्षासाठी (सन २०२२ ते २०२७) मान्यता प्राप्त झाली आहे.** अशी माहिती कुलगुरु प्रा.डॉ.दिगंबर शिर्के यांनी येथे दिली.कुलगुरु डॉ.शिर्के यांनी दिलेल्या माहितीनुसार युजीसीकडून मान्यता मिळालेल्या अभ्यासक्रमामध्ये बी.ए., बी.कॉम., एम.ए., भाषा (इंग्रजी, हिंदी, मराठी), एम.ए. सामाजिकशास्त्र (इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र) एम.कॉम. एम.एस्सी. (गणित) या पदवी व पदव्युत्तर विषयांचा समावेश आहे. दूरस्थ: आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राकडील एकूण बारा अभ्यासक्रमांना विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता मिळणेसाठी प्र–कुलगुरु प्रा. डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परिक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव व दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे आणि विद्यापीठातील विविध अधिकारी मंडळे यांचे विशेष सहकार्य लाभल्याचे कुलगुरु डॉ. शिर्के यांनी सांगितले.

महासत्ता

# नॅनोसायन्सच्या विद्यार्थ्यांची प्रशिक्षणासाठी निवड

कोल्हापूर, ता.८(प्रतिनिधी)–

.........................

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी या अधिविभागामध्ये बी.एस्सी.–एम.एस्सी.नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी (५ वर्षांचा एकात्मिक) अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थी कु. विशाल पांडुरंग भांदिगरे (रा. पुंगाव, कोल्हापूर) आणि कु. अनुषा सुरेश अगसिबागिल (रा. कोल्हापूर) यांची संशोधन आणि विकासासाठी अग्रेसर असणाऱ्या भाभा अणुसंशोधन केंद्र, मुंबई येथे एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे.

तसेच कु. तेजश्री राजेंद्र जाधव (रा.आंधळी, सांगली) आणि आकांक्षा अमरनाथ करंबळी (रा. मिरज, सांगली) यांची फाउंड्री उद्योगातील नामवंत सेराफ्लक्स इंडिया प्रा. लि., कोल्हापूर व स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभाग यांच्या सहयोगी शोध प्रकल्पांतर्गत एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ.विलास शिंदे यांच्यासह नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा व सर्व शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

पुढारी

# डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या 'ऑनलाईन जर्नालिझम'चा निकाल शंभर टक्के

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने सुरू असलेल्या पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम या अभ्यासक्रमाचा निकाल शंभर टक्के लागला.

डिप्लोमा अभ्यासक्रमासाठी २९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. त्यापैकी १६ विद्यार्थी परीक्षेला बसले. सर्व विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले. येत्या शैक्षणिक वर्षासाठी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. कोणत्याही पदवीधारकास अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येतो. शनिवार व रविवारी विद्यापीठात डिजिटल माध्यमाचे प्रशिक्षण दिले जाते. अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्यासाठी अध्यासनात स्वतंत्र स्टुडिओ व संगणक लॅब आहे. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर माध्यमांमध्ये करिअरच्या चांगल्या संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थी व पत्रकारांनी अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यावा, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

09 SEP 2022 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण, ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे प्रवेश प्रक्रियेबाबत कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील ८६ अभ्यासकेंद्रांतील समन्वयक व लेखनिक यांच्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठीच्या प्रवेश प्रक्रियेबाबत माहिती देण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन केले असल्याची माहिती संचालक प्रा.डॉ.डी.के.मोरे यांनी दिली. संगणक केंद्राचे प्रभारी संचालक डॉ.अभिजित रेडेकर यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन होणार आहे. उपकुलसचिव डॉ.एन.जे.बनसोडे, उपकुलसचिव सी.ए.कोतमिरे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. महाविद्यालय अभ्यासकेंद्राच्या समन्वयक व लेखनिक यांनी कार्यशाळेसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन दूरशिक्षण विभागाने केले आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून ३१२ परीक्षांचे निकाल घोषित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्र परीक्षेअंतर्गत ३१२ परीक्षांचे निकाल घोषित झाले आहेत. विद्यापीठ उन्हाळी सत्रांतर्गत ५६१ परीक्षा एमसीक्यू ऑफलाईन पद्धतीने सुरळीतपणे पार पडल्या. गुरुवारी बी. व्होक. सह इतर परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत.

तरुण भारत

# दूरशिक्षणतर्फे प्रवेशासंदर्भात १२ सप्टेंबर रोजी कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने तीन जिल्ह्यातील ८६ अभ्यास केंद्रातील समन्वयक व लेखनिकांसाठी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठीच्या प्रवेश प्रक्रियेबाबत माहिती देण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन केले आहे. यामध्ये कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्हयातील सर्व केंद्रांचा समावेश आहे, अशी माहिती संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी दिली. बी.ए., बी.कॉम., एम.ए., (मराठी, हिंदी, इंग्रजी, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास) एम.कॉम. व एम. एस्सी. (गणित) या अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे. त्या अनुषंगाने सोमवार १२ सप्टेंबर रोजी सकाळी ११:३० वाजता केंद्रामध्ये कार्यशाळेचे आयोजन केलेले आहे. यावेळी संगणक केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. अभिजित रेडेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्हयातील महाविद्यालयातील अभ्यासकेंद्राच्या समन्वयक व लेखनिक यांनी या कार्यशाळेसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन संचालक डॉ. मोरे यांनी केले आहे.